# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्रं. 382/2023 दिनांक : 05.10.2023

## 1)खुनाचा प्रयत्न :–

**शिवाजीनगर :–** दिनांक 03.10.2023 रोजी चे 22.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरासमोर रोडवर राजनगर नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून तु आमचे विरूध्द शिवाजीनगर पोलीस स्टेशन नांदेड येथे गुन्हा का दाखल केला असे म्हणुन फिर्यादीस त्यांचे हातातील तलवारीने डोक्यात मारून गंभीर दुखापत करून खुन करण्याचा प्रयत्न केला. डाव्या खांद्यावर व मनगटावर तलवारीने मारून गंभीर दुखापत केली. तसेच शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी दिपक वामन जाधव, वय 40 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. राजनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरन 330/2023 कलम 307, 504, 506, 34 भादवी सह कलम 4/25 भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री पुणे, मो.क्रं. 9403188318** हे करीत आहेत.

## 2)गंभीर दुखापत :–

**ईस्लापुर :–**दिनांक 02.10.2023 रोजी चे 16.30 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे राहाते घरासमोर मौ. इरेगाव ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा घरी असतांना यातील नमुद आरोपी हा फिर्यादीचे घरासमोर येवुन आवाजा दिल्याने फिर्यादी घराबाहेर आला असता त्यास तुझ्यामुळे माझा भाऊ बिघडला आहे म्हणुन शिवीगाळ करून थापड बुक्याने मारहाण केली व उजवा हात धरून मुरगाळुन फिरवुन ओढुन खाली पाडल्यामुळे फिर्यादीचे उजव्या खाद्यांचे सांध्यात जबर दुखापत केली आहे. वगैरे **फिर्यादी शिवाजी रामकिशन आमले, वय 22 वर्षे, व्यवसाय शेती रा. ईरेगाव ता. किनवट जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे ईस्लापुर** गुरन 97/2023 कलम 325, 323, 504, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/तोंडेवाड, मो. नं. 8080308059** हे करीत आहेत.

## 3)सदोष मुनष्यवध :–

**1)नांदेड ग्रामीण :–** दि. 30.09.2023 रोजी चे 20.00 ते दि.04.10.2023 रोजी चे 10.30 वा. चे दरम्यान, **विष्णुपूरी ता. जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे फिर्यादीची मुलगी अंजली व तिचे जन्मलेले बाळ विष्णुपूरी नांदेड** यातील फिर्यादीची मुलगी अंजली हिस सरकारी दवाखाना विष्णुपूरी नांदेड येथे डिलीव्हरीसाठी शरीक केले असतांना आरोपीतांनी संगणमत करून सरकारी दवाखान्याचे डीन व बाळांचे दवाखान्याचे मुख्य डॉक्टर यांनी यातील नमुद पेशंटवर उपचारा दरम्यान योग्य तो उपचार न करता त्यांच्याकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष केले. तसेच हाताखालील डॉक्टर व नर्स उपचारासाठी उपलब्ध करून दिले नाही. व अत्यावश्यक औषध सेवा उपब्ध करून दिले नाही. फिर्यादी यांना सर्व औषधी व रक्ताचे पॉकेट बाहेरून आणावयास लावले त्यामुळे फिर्यादी यांचे आणलेल्या औषधांचा व रक्तांचे पॉकेटचा 45,000/–रूपये खर्च झालेला आहे. सरकारी दवाखाना येथुन फिर्यादीच्या मुलीवर व तिचे बाळावर उपचाराची कोणतीही व्यवस्था केली नाही. सरकारी दवाखाना विष्णुपूरी नांदेड येथे मागील चार दिवसात फिर्यादीस डीन यांनी जाणुन बुजून पेशंटला, डॉक्टर, नर्स औषध उपलब्ध करून न दिल्यामुळे उपचारा अभावी बरेच पेशंट मृत्यु पावले आहेत. पेशंटच्या मृत्युस यातील नमुद आरोपी हे कारणीभुत आहेत. वगैरे **फिर्यादी कामाजी मोहन टोम्पे, वय 40 वर्षे, व्यवसाय शेत मजुरी रा. कुरूळा ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं. 705/2023 कलम 304(अ), 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री सचिन गढवे, मो.क्र. 9325787605** हे करीत आहेत.

**2)सिंदखेड :–** दि. 03.10.2023 रोजी चे 11.50 वा. चे सुमारास, **मौ. वाई बा. ता. माहुर जि. नांदेड येथे** यातील ग्रामपंचायात वाई बाजार अंतर्गत वार्ड क्रमांक 05 मध्ये सांडपाणी व घनकचरा नाली व्यवस्थापन बांधकाम अंतर्गत सुरू असलेल्या नमुद कामाचे ठेकेदार व नमुद कामाची संबधीत एजंसी यांनी हलगर्जीपणाने नालीचे निकृष्ट दर्जाचे बांधकाम केल्याने नालीचे 30 फुट लांब व 08 फुट उंचीची भिंत मजुराचे अंगावर कोसळल्याने त्यामध्ये **1)संजय किशन मडावी, वय 35 वर्षे, व्यवसाय मजुरी 2) शुभम भिमराव पेंदोर, वय 23 वर्षे, व्यवसाय मजुरी दोघे रा. गौंडखेडी ता. माहुर जि. नांदेड** हे मरण पावले आहे. **सुमीत सिताराम मरापे, रा. गोंडखेडी ता. माहुर** हा गंभीर जखमी झाला आहे. यातील मयताचे मरणास व जखमी होणेस यातील एंजेसी व संबधीत ठेकेदार हे कारणीभुत आहेत. वगैरे **फिर्यादी दत्ता किशन मडावी, वय 45 वर्षे, व्यवसाय शेत मजुरी रा. गोंडखेडी ता. माहुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे सिंदखेड** गुरनं. 106/2023 कलम 304(अ), 338 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2106 पठाण, मो.क्र. 9309574775** हे करीत आहेत.

## 4)विवाहीतेचा छळ :–

**1)नांदेड ग्रामीण :–** दिनांक 07.03.2020 रोजी चे 11.00 ते दि. 09.04.2020 चे 15.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे सासरी नगरेश्वर मंदीर पोस्ट ऑफिसच्या समोर लोहा ता. लोहा ह. मु. नांदेड ग्रामीण हध्दीत माहेरी जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस प्लॉट घेण्यासाठी चारचाकी गाडी घेण्यासाठी वीस लाख रूपये घेवुन ये असे म्हणुन उपाशी पोटी ठेवुन शारिरीक व माणसीक छळ केला. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी** 23 **वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 704/2023 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2141 पांचाळ, मो.क्रं. 9923696860** हे करीत आहेत.

## 5)जुगार :–

**1)रामतिर्थ :–** दिनांक 04.10.2023 रोजी 20.30 वा. चे सुमारास, **मौ. लोहगाव जाणाऱ्या रोडच्या डाव्या बाजुस कॅनल रोडने जाणाऱ्या माळावर ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या गोलाकार बसुन पत्यावर पैसे लावुन तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 5,000/–रुपये व जुगाराचे साहित्य तीन मो सा किंमती 72,000/–रूपये असा एकुण 77,000/–रू माला सह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/485, अनिल बालाजी रिदकवाले, ने. पोस्टे रामतिर्थ** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे रामतिर्थ** गुरनं 179/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/शेख, मो.क्रं. 9823206919** हे करीत आहेत.

**2)अर्धापुर :–** दिनांक 04.10.2023 रोजी 18.10 वा. चे सुमारास, **मौ. मालेगाव येथील सिध्दार्थनगर सार्वजनिक रोडवर ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण क्लोज नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 2610/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/485, अनिल बालाजी रिदकवाले, ने. पोस्टे अर्धापुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 372/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2803 चाटे, मो.क्रं. 967311158** हे करीत आहेत.


जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड